# पालक-शिक्षक संघ
## "एक दिवस पाल्यासाठी"

## अहवाल

दि :- १७/१०/२०२४

---

प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगावच्या वतीने दि.१६ ऑक्टोबर २०२४ रोजी "एक दिवस पाल्यासाठी" हि संकल्पना घेऊन पालक मेळावा संपन्न झाला.या मेळाव्याचा मुख्य उद्देश पालकांना त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल माहिती देणे आणि विविध उपक्रमांध्ये पालकांचा सहभाग वाढवणे व पालक आणि शिक्षक यांच्यातील संवाद वाढवणे हा होता . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शशिकांत कुचेकर हे होते . या कार्यक्रमात महाविद्यालयाचे उप- प्राचार्य डॉ. ओंकार रसाळ यांनी पालकांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न आणि शंका स्पष्टपणे सोडविल्या. त्यांनी पालकांना महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रक्रिया,विद्यार्थ्यांच्या विकासाठी उपक्रम आणि इतर महत्वाच्या मुद्यांवर मार्गदर्शन केले.यावेळी उपस्थित पालकांपैकी पठाण वजीर बाबूलाल यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी महाविद्यालयातील सुविधा,शिक्षण पद्धती,शिस्त यावर मनोगत व्यक्त केले. सर्व पालकांनी महाविद्यालयाच्या सर्व विभागांना,प्रयोगशाळा तसेच ग्रंथालयाला भेट दिली. तसेच महाविद्यालयाच्या वनस्पती उद्यानाला भेट दिली . या कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष समन्वयक प्रा.साजेद पटेल, महाविद्यालय परीक्षा अधिकारी प्रा.हमीद शेख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सुरेश नजन, या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.एकशिंगे ऋतुजा तसेच इतर प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.गणेश शेळके यांनी केले, ज्यांनी पालकांना महाविद्याल्याच्या विविध शैक्षणिक आणि सहशैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रीती शिनगारे यांनी अत्यंत प्रभावीपणे पार पाडले. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक मोहन परतवाघ यांनी केले आणि सर्व उपस्थितीबद्दल मन:पूर्वक आभार मानले.

या कार्यक्रमाने पालक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या सहभागातून ज्ञानाची देवाणघेवाण घडवली. "एक दिवस पाल्यासाठी" या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना पालकांच्या सहभागाचे महत्त्व समजले. सर्वांनी उत्साहाने सहभागी होऊन या कार्यक्रमाची शोभा वाढवली.

PMT'S Arts, Commerce & Science College Shevgaon Dist. Ahmednagar

Principal
Arts, Comm. & Sci. College
Shevgaon, Dist. Ahmednagar